## रे.दि.मु.नं. ५५८/२०१७ मधील नि.२९ खालील आदेश

(संभाजी हरीबा बुरुंगुले वि. विलास नामू घुटूकडे-५)

CNR No.MHSO20-002201-2017

प्रस्तुत अर्ज वादी यांनी वारस रेकॉर्ड वर घेण्यास झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीचे कथनानुसार, प्रतिवादी क्र.२ ईश्वरा नामु घुटूकडे हे दि.०३/०५/२०२१ रोजी मयत झाले आहेत. मयत प्रतिवादी ईश्वरा नामु घुटूकडे यांचे मृत्यू प्रमाणपत्र नि.क्र.३६ कडे दाखल केले आहे. वादी आजारी असल्याने व इंडोप्लॅस्टीक बाय पास सर्जरी झाल्यामुळे वकीलांना माहिती देवुन मुदतीत वारस रेकॉर्डवर आणता आले नाहीत. मयत प्रतिवादी क्र.२ चे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी सुमारे ११ महिने २३ दिवसांचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा योग्य व न्याय कारणासाठी झालेला असून यातील वादीने सदरचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी जाणीवपूर्वक विलंब केलेला नाही. सदरचा विलंब माफ झालेस प्रतिवादी यांचे काहीही नुकसान होणार नाही. याउलट विलंब माफ न झालेस वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे सदरचा विलंब माफ व्हावा अशी विनंती केली.

३. सदर अर्जास प्रतिवादीतर्फे दिलेल्या म्हणणे मध्ये त्यांनी वादी यांना दंड करण्याचा अटीवर मंजूर करण्यास नाहरकत दर्शविले.

४. सदरच्या अर्जावर दोन्हीं वकिलांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीची मोजणी होवुन हद्दीखुणा कायम होवुन मिळणेचा व निरंतरचे ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. दाव्यातील मागणी पाहता वादाचा विषय गुणदोषांवर निर्गत होणे आवश्यक आहे. त्यासाठी मयत प्रतिवादी क्र.२ यांचे वारसांना दाव्यात सामील करणे आवश्यक आहे. त्यासाठी दोन्हीं पक्षकारांना योग्य ती संधी देणे आवश्यक आहे. सदर अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. याउलट, दावा गुणदोषांवर निर्गत होणेस मदतच होईल.

परंतु वादीने केलेला ११ महिने २३ दिवसांचा विलंब लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यासाठी विलंबाचा खर्च त्याच्यावर ठेवणे योग्य आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## आ दे श

१. अर्ज (नि.२९) वादी यांनी रक्कम रु. २००/- (रुपये दोनशे फक्त) एवढे पुढील तारखेपर्यंत प्रतिवादींना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. मयत प्रतिवादी क्र.२ ईश्वरा नामु घुटूकडे यांचे वारसांना दाव्यात सामील करण्याची परवानगी देण्यात येते.

BHAGYASHRI MADHUKAR POTDAR

Digitally signed by BHAGYASHRI MADHUKAR POTDAR
Date: 2022.06.27 12:10:23 +0530

सांगोला. (सौ. बी. मधुकर पोतदार)

दिनांक: २४/०६/२०२२. दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सांगोला

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Mrs. B. M. Potdar,<br>2nd Jt. Civil Judge,<br>J.D.& J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 24.06.2022 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 27.06.2022 |